# जिल्हा परिषद, रायगड

## बांधकाम विभाग

## ई-निविदा सन 2026-27(1st call)

## ( ई-निविदा सुचना क्रमांक -15)

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग, हे कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग रायगड जिल्हा परिषद, अलिबाग कडील खालील कामांची निविदा योग्य त्या जिल्हा परिषदेकडील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून Percentage rate tender दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत. तरी खालील निविदा बाबतची माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | BOQ नुसार कामाची रक्कम रु. | टेंडर फी रक्कमा रु. GST | लेखाशिर्ष | इसारा रक्कम | कंत्राटदार वर्गीकरण | आवश्यक कंत्राटदार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | मौजे मुठवली तर्फे निजामपूर ग्रा.पं. मुठवली तर्फे निजामपूर ता.माणगांव येथे नवीन अंगणवाडी इमारत बांधणे. | ११,२४,४३२/- | ५९० | डोंगरी विभाग विकास कार्यक्रम | ०/- | वर्ग ६ अ व त्यावरील | जिल्हा परिषद कडील नोंदणीकृत **सु.बे.अ.** |
| २ | विणवली येथे महिल बचत गट प्रशिक्षण केंद्र बांधणे, ता.तळा | १४,९८,४०७/- | ५९० | जिल्हा खनिज प्रतिष्ठान | ०/- | वर्ग ६ अ व त्यावरील | जिल्हा परिषद कडील नोंदणीकृत **सु.बे.अ.** |
| ३ | कुसुमेश्वर मंदिर देवखोल ग्रा.पं.नागलोली येथे संरक्षण भिंत बांधणे, ता.श्रीवर्धन | १४,९९,६२०/- | ५९० | क श्रेणी यात्रास्थळांचा विकास | १४,९९६/- | वर्ग ६ अ व त्यावरील | जिल्हा परिषद कडील नोंदणीकृत **खुला** |

**१. वरील कामाची संपूर्ण माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक-१४/०५/२०२६ रोजी सकाळी-१०.०० वा. पासून ते दिनांक-२८/०५/२०२६ रोजी १०.०० वा. पर्यंत भरता व डाऊनलोड करता येतील.**

## निविदेचे वेळापत्रक

| तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|
| संकेतस्थळावरुन ई-निविदा प्रसिध्दी व डाऊनलोड करणेचा कालावधी | दि.**१४/०५/२०२६** पासून | १०.०० |
| | दि.**२८/०५/२०२६** पर्यंत | १७.०० |
| ई-निविदा सादर करणेचा अंतिम कालावधी | दि.**२८/०५/२०२६** पर्यंत | १७.०० |
| ई-निविदा उघडणेची वेळ व तारीख | दि.**२९/०५/२०२६** | १७.०० |

| | |
|---|---|
| ई-निविदा उघडणेसाठी प्राधिकृत केलेले अधिकारी | १.मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प.अलिबाग |
| | २.मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, रा.जि.प.अलिबाग |

**सदर कामाच्या निविदे बाबत खालील बाबी अपलोड करणे आवश्यक राहतील.**

1. निविदांची निविदा फी (Tender Fee) व इसारा रक्कम (EMD) हे बॅकेच्या RTGS/NEFT व्दारे खालील खातेमध्ये संबंधीत RTGS/NEFT या युनिक ट्रान्झॅक्शन रजिस्ट्रेशन (UTR) क्रमांक नोंदवून तांत्रिक लिफाफ्यामध्ये अपलोड करण्यात यावे. (सद्यस्थितीत हा तपशिल ऑनलाईन DD Details साठी ठेवलेल्या जागेमध्ये भरावा.
2. रायगड जिल्हा परिषद अंतर्गत कंत्राटदाराचे योग्य त्या वर्गातील वैध नोंदणी प्रमाणपत्राची मुळ प्रत (REGISTRATION COPY) निविदेसोबत अपलोड करावी.
3. ज्या कंत्राटदारांकडे जिल्हा परिषद रायगडकडील नोंदणी प्रमाणपत्र नाही, अशा कंत्राटदारांनी नव्याने जिल्हा परिषद रायगडकडे नोदणी करण्यासाठी आवश्यक कागदपत्राचा तपशिल हा जि.प.च्या https://zpraigad.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर देण्यात आला आहे. तरी आवश्यककागदपत्रे व नोंदणीशुल्क भरणा करुन जि.प. रायगडकडील कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करावे व निविदा सादर करावी.
4. सदर निविदेस निविदाधारकास कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यानंतर आठ रोजात काम सरु करणेत यावा अन्यथा सदर निविदाधारकास काळया यादील समाविष्ठ करण्यात येईल.
5. **रु. १.५० कोटी पेक्षा जास्त कामांकरीता शासन स्तरावरून कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र मिळवून घेवून तदनंतर आपली निविदा सादर करावी.**
6. स्थापत्य अभियांत्रिकीचे कामाशी संबंधित शासकीय/निमशासकीय संस्थेत निविदेच्या ३०% किमान किमतीचे मागील वर्षात यशस्वीपणे काम पुर्णकेल्याचा कामाचा कार्यारंभ आदेश व काम पुर्णत्वाचे सक्षम प्राधिकाराने दिलेले आदेश व प्रमाणपत्र (Work Done & Work in Hand) सोबत जोडावेत. (From No-III )
7. पॅन कार्ड / आधार कार्ड स्कॅन प्रत अपलोड करावी.
8. INCOME TAX RETURNS 2021-22 TO 2024-25 निविदेसोबत अपलोड करावी.
9. निविदाधारकाने सदर योजनेच्या अंमलबजावणीचे कामाचे ठिकाणी स्वत: जावून नैसर्गिक परिस्थीतीचा आढावा घेणेगरजेचे आहे. व तदनंतर सदरील काम करणेची स्वत:चीखात्री पटल्यानंतरच निविदा सादर करावी. तसा दाखला स्वता:चे लेटरहेडवर जोडावा.
10. सदरीलकामाचा आर्थिक लिफाफा उघडलेनंतर L१ निविदाधारकांने ०७ दिवासात विहित नमुन्यात करारनामा करुन घेणे बंधनकारक राहील. विहीत मुदतीत आवश्यककागदपत्रांची पुर्तता न केलेस संबंधित L१ निविदाधारकावर विरोधात प्रशासकीय कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.
11. GST CERTIFICATE ORIGINAL COPY (स्कॅन) निविदेसोबत अपलोड करावी.
12. Currant Bid capacity Certified by C.A. (From No-VII)
13. Scanned From Original Copy of latest Professional Tax Clearance Certificate Upto 31 March 2023
14. **निविदा नोटिसमधील जर डांबरीकरणाची कामे असतील तर शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-2018/प्र.क्र.93/रस्ते-1/2018 दि.24 ऑगस्ट 2018 नुसार रक्कम रू.50 लक्ष पर्यत कामाकरीता हॉट मिक्स प्लॅन्ट स्वत:चा असणे आवश्यक नाही.**
15. **महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.सीएटी-2018/प्र.क्र.-127/इमा-2/मंत्रालय, मुंबई, दिनांक 28/11/2018 अन्वये** निविदा प्रपत्रातील Declaration of the Contractor विहीत नमुन्यातील कंत्राटदाराच प्रत्येकी वैय्यक्तीकरु.500/- च्या बाँड (bond) पेपर वर(**With Affidavit Before Magistrate /Nottary**)**करून** स्कॅन प्रत अपलोड करावी.
16. **निविदा भरण्याचा कालावधी संपल्यानंतर तांत्रिक लिफाफा उघडण्यापुर्वी मुंबई शुल्क 1958 चे नियमानुसार 500 रु. रक्कमचेAffidavit Before Magistrate /Nottaryकेलेले स्टँप पेपर कार्यालयाकडे सादर करावे लागेल.**

17. **बांधकाम व इतर कामाचे मजुर (रोजगार नियमन व सेवेच्या शर्ती) अधिनियमन 1996 व त्याखालील बनवण्यात आलेल्या विविध नियम यांचे पालन करणे बंधनकारक राहील. इमारत व इतर बांधकामे मजुरांचे कल्याण सेस नियम 1968 मधील नियमांचे पालन करावे.**

18. शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेकडील नोंदणीकृत मजूर सहकारी संस्थांची /सुशिक्षित बेरोजगार अभियंता कामे करण्याची सन 2025-26 मधील एकूण वार्षिक वित्तीय मर्यादा संपुष्टात आली आहे, अशा मजुर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंता सदरची निविदेसाठी पात्र ठरणार नाहीत.

19. कार्यारंभ आदेश निर्गमित झालेल्या दिवसापासुन 15 दिवसाच्या आत काम सुरु करणे व दिलेल्या कालावधीत पुर्ण करणे बंधनकारक आहे.

20. महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार, सन 2024 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक12 दि.14/10/2024 मधील सुचनेनुसार L1 निविदाधारकाकडून खालील प्रमाणे मुद्रांक शुल्क वसूल करण्यांत येणार आहे.
अ) कंत्राटामध्ये ठरविण्यांत आलेली रक्कम किंवा मूल्य पाच लाख रूपयांपेक्षा अधिक नसेल तर, रु.500/- इतका मुद्रांक शुल्क वसूल केला जाईल.
**ब) मूल्य पाच लाख रूपयांपेक्षा अधिक असेल तर, रु.500/- + पाच लाख रुपयांवरील रकमेच्या 0.3% इतका मुद्राक शुल्क वसूल केला जाईल.**

21. **महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र.सीएटी-2017/प्र.क्र./इमा-2/मंत्रालय, मुंबई, दिनांक 26/11/2018 मधील मार्गदर्शक सुचनेनुसार स्पष्टीकरण खालील प्रमाणे,**
**दि.27/09/2018 च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.4.6.3 (ब) मध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.**

**देकार-15% पेक्षा कमी दराच्या असल्यास उर्वरित रक्कमेसाठी दोन पटीने रक्कम डी.डी.व्दारे सादर करणे अनिवार्य राहील. उदा.19% कमी दराकरीता (19-15 = 4) % x 2 = 8%**

**ऐवजी**

**देकार-15% पेक्षा कमी दराच्या असल्यास उर्वरित रक्कमेसाठी दोन पटीने रक्कम डी.डी.व्दारे सादर करणे अनिवार्य राहील. उदा.19% कमी दराकरीता खालीलप्रामाणे पृथ:करण**

**10% कमी दारापर्यत 1%**

**15% कमी दारापर्यत (15%-10% = 5 %**

**तसेच (19-15) = 4 % करीता (4 x 2 = ) 8 %**

**असे एकुण (1+5+8) =14%**

**L-1 निविदाधारकाने प्राप्त निम्नतम निविदेच्या देकार निविदाधीन कामाच्या "Additional Performance Security Deposit"रक्कमेचा धनाकर्ष (Demand Draft) (मुख्य लेखा व वित्त अधिकारी रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांचे नावे ) परफॉर्मन्स सिक्युरीटी म्हणून निविदा उघडल्यानंतर आठ दिवसाच्या आत मा.कार्यकारी अभियंता (बांधकाम ) रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांचेकडे जमा करणेचा आहे.**

**L-1 निविदा धारकाने वरिल विहीत मुदतीत "Additional Performance Security Deposit"भरणा नाही केली तर महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र.सीएटी-2017/प्र.क्र./इमा-2/मंत्रालय, मुंबई, दिनांक 27/09/2018 मधील 4.6.5 (छ) मार्गदर्शक सुचनेप्रमाणे L-1 निविदाधारकाची EMD जप्त करून संबधीत ठेकेदारास काळया यादीत नाव समाविष्ठ करण्याची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

22. ठेकेदाराने कामावर आलेल्या मजुरांची यादी ई-निविदेसोबत जोडण्यात यावी. तसेच कामावर आलेल्या सर्व मजुरांचा काम सुरू करण्यापुर्वी विमा काढण्यात यावा. अन्यथा प्रत्यक्ष काम करतेवेळी मजुर कर्मचारी अनावधानाने अपघात व दुखापत मृत्यू झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत ठेकेदाराची असेल. त्यासाठी जिल्हा परिषद मार्फत कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

23. **महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.सीएटी-1/2015/प्र.क्र.-20/इमा-2/मंत्रालय, मुंबई, दिनांक 24/04/2015 अन्वये म.स.स. व सु.बे.अ. यांना देण्यात येणाऱ्या संवर्गात त्यांना देय असलेल्या विनास्पर्धा कामाच्या मर्यादा रक्कमेपर्यत कामे मिळेपर्यतच त्यांना त्यांच्या संवर्गातून स्पर्धा करून कामे घेता येतील सदर मर्यादा संपल्यानंतर त्यांना सामान्य कंत्राटदाराप्रमाणे खुल्या निविदामध्ये भाग घेवून कामे मिळवावी लागतील तसेच त्याना इतर कोणत्याही सवलती देय राहणार नाही.**

24. निविदा नोटीसमधील व करारनाम्यातील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारास बंधनकारक राहतील.

25. वरिल कामाबाबत निधीचे उपलब्धतेनुसार पार पाडलेल्या कामाचे भुगतान करण्यात येईल ह्या कारणामुळे झालेल्या विलंबाबाबत कोणतेही प्रकारचा दावा ऐकला जाणार नाही.

26. **वित्त विभाग शासन परिपत्रक जीएसटी-1017/प्र.क्र.81/कराधान-1/2017/ दिनांक-19/08/2017 मधील मुद्दा क्र.1 नुसार निविदा सादर करतांना दिनांक-1/07/2017 नंतर लागु झालेल्या जीएसटीच्या कराच्या बोज्याच्या विचार करूनच निविदा सादर करावी.तसेच काही फरक निघाल्यास ती निविदाधारकांने एक रक्कमेस भरणा करणे आवश्यक आहे.**

27. **महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.सीएटी-2018/प्र.क्र.-127/इमा-2/मंत्रालय, मुंबई, दिनांक 28/11/2018 अन्वये निविदेसोबत सादर करण्यात आलेली कागदपत्रे खोटी आढळून आल्यास भा.द.वि.स.अंतर्गत संबधिकत कंत्राटदारविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. याची सर्वस्वी जबाबदारी ऑनलाई खोटी कागदपत्रे सादर करणारे कंत्राटदार जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.**

28. **महाराष्ट्र शासन सहकार, पतन व वस्त्रोद्योग विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.न्यायप्र-1516/प्र.क्र.245/9-स/ दि.21/01/2017 च्या आदेशाचे पालन करुन सहाय्यक निबंधक/उपनिबंधक यांचेकडून पात्रता प्रमाणपत्र प्राप्त करणे संबधीत मजुर सहकारी संस्था यांना बंधनकारक राहील यांची नोंद घ्यावी.**

29. **मा.अवर सचिव, ग्राम विकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील याचिका 2018/प्र.क्र.198/बांधकाम-4 दि.12 ऑक्टोबर 2018 अन्वये अवगत केल्यानुसार मा.सर्वोच्च न्यायालयीन आदेशाचे पालन करणे आपणावर बंधन कारक व अनिवार्य आहे. आपण दिलेल्या निर्देशानुसार आपली व आपल्याकडील काम करणा-या सर्व कामगारांची महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणी करुन त्यांचे प्रमाणपत्र सादर करणे आपणांवर बंधणकारक राहील.**

30. **महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र.सीएटी-2007/प्र.क्र.-8/इमा-2/2019 दिनांक- 29/01/2019 अन्वये ऑनलाईन निविदा सादर केल्यानंतर, निविदा धारकास लेखी पत्र देऊन निविदेतुन माघार घेता येणार नाही. निविदाधारकाने असे केल्याचे दिसून आल्यास संबंधित निविदाधारकाचे नोंदणी प्रमाणपत्र काळया यादीत समाविष्ट करणे तसेच त्याची सुरक्षा अनामत/इसारा रक्कम जप्त करणेची कार्यवाही करणेत येईल याची निविदाधारकाने गंभीर नोंद घ्यावी.**

31. तसेच जिल्हा परिषद ही स्थानिक स्वराज्य संस्था असल्यामुळे ई-निविदे संदर्भात विविध अटी / शर्ती महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाने निर्गमित केलेले सर्व आदेश, शासन निर्णय, परिपत्रके, मार्गदर्शक सुचना या वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांसह ठेकेदारावर लागू राहतील.

32. या कामासाठी आलेल्या निविदा पैकी कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत. आणि निविदा पाठविणाऱ्या काणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला (निविदा) फेटाळल्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| (विनायक तेलंग) | (राहुल कदम) | (प्रियदर्शनी मोरे) |
| कार्यकारी अभियंता (बांध.), | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | अति मुख्य कार्यकारी अधिकारी, |
| रायगड जिल्हा परिषद, अलिबाग | रायगड जिल्हा परिषद, अलिबाग | रायगड जिल्हा परिषद, अलिबाग |

Signature Not Verified

Digitally signed by Vinayak Gopal Telang
Date: 2026.05.14 16:37:25 IST
Location: Maharashtra-MH